# विज्ञानवादी संत गाडगेबाबा

गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून लोकांना जागे करण्याचा प्रयत्न केला. गाडगेबाबा कीर्तनात काय करायचे माहित आहे? ते लोकांना प्रश्न विचारुन भंडावून सोडायचे. एकदा अशाच एका कीर्तनात त्यांनी लोकांना विचारले,

**“बरं पोरासाठी देवाला नवस करता का नाही?”** लोकं म्हणाली, **“हो करतो.”**

**“चार पायाचं बकरू कबूल करता का नाही?”** लोकं म्हणाली, **“हो करतो.”**

**“मंग देवाले बोकड कबूल कापता की नाही?”** लोकं म्हणाली, **“हो कापतो.”**

**“खसाखसा मसाले वाटता की नाही?”** लोकं म्हणाली, **“हो वाटतो.”**

**“पोट अगदी तणावेपर्यंत ताव मारता की नाही?”** लोकं म्हणाली, **“हो मारतो.”**

**“तुमच्या अकलेत काय धोंडा पडला काय? नवस केल्यानं पोरं होत असतात का?”**

*“नवसे कन्या पुत्र होती, तो का करणे लागे पती”* म्हणजे **“नवसानं जर पोरं होत असतील तर मंग लग्न, बाशिंग, मुंडावळ्या, वरात, ढमांग ढमांग हे सगळं कशाला करता? कोण्याही बाईनं उठावं, एक बकरू देवळात न्यावं आणि पोर कडेवर घेऊन मागे यावं. नवरा हवाच कशाला?”**

## गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला

अशाप्रकारे लोकांच्या मनातील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न गाडगेबाबांनी केला. तसाच त्यांनी ढोंगी बुवाबाजीवर पण हल्ला केला. एकदा एक बाबा नदीवर विधी करत होता. आत्म्यांच्या तृप्तीसाठी अन्न आणि वस्तू अर्पण करत होते. गाडगेबाबांनी ते पाहिले आणि बाबा लगेच नदीत उतरले. नदीचे पाणी त्या विधीच्या दिशेने पेकू लागले. ते पाहून तो बाबा म्हणाला, **“अरे बाबा, हे तू काय करतोयस?”**

गाडगेबाबा म्हणाले, **“इथून 10 कोसावर माझी कपाशीची शेती आहे. तिला पाणी घालतोय.”**

तो बाबा म्हणाला, **“अरे मुर्खा, इतक्या दूरवर असलेल्या तुझ्या शेताला इथून पाणी कसे पोहोचणार?”**

गाडगेबाबा म्हणाले, **“तुमचे इथले लाडू जर आत्म्यापर्यंत पोहोचत असतील तर मग माझे हे पाणी शेतीला का पोहोचणार नाही?”**

अशाप्रकारे, गाडगेबाबा आपले म्हणणे लोकांना पटवून देत आणि अंधश्रद्धांपासून लोकांना दूर करण्याचा प्रयत्न करत.

आपले संविधानही आपल्याला अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यास सांगते.